कोवीड-१९ तपासणीसाठी राज्यातील एनएबीएल व आयसीएमआर मान्यता प्राप्त प्रयोगशाळेतून आरटीपीसीआर तपासणीसाठी कमाल दर निश्चित करणेबाबत....

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
गो. ते. रुग्णालय संकुल इमारत,
१० वा मजला, मंत्रालय, मुंबई ४०० ००१.
शासन निर्णय क्र. कोरोना-२०२०/प्र.क्र.१२३ (२)/आरोग्य- ५
दिनांक : ०७ सप्टेंबर, २०२०

**संदर्भ** :-

१) शासन निर्णय समक्रमांक दिनांक ०२.०६.२०२०.
२) शासन निर्णय समक्रमांक दिनांक ०७.०८.२०२०.

**प्रस्तावना** :-

संदर्भ क्र. १ मध्ये नमूद केलेल्या शासन निर्णयानुसार भारतीय आयुर्विज्ञान संस्था व एनएबीएल मान्यता प्राप्त खाजगी प्रयोगशाळांकडून कोविड-१९ साठी असलेल्या आरटीपीसीआर तपासणीचे दर निश्चिती करण्यासाठी समिती गठित करण्यात आली होती. यासमितीने तत्कालीन लॉकडाऊन परिस्थितीत मर्यादित साधन उपलब्धता लक्षात घेऊन, खाजगी प्रयोगशाळांशी चर्चा करून, खाजगी प्रयोगशाळानी आरटीपीसीआर तपासणीसाठी आकारावयाच्या दराबाबतचा अहवाल शासनास सादर केला होता. त्यानुसार संदर्भ क्र. २ मध्ये नमूद शासन निर्णयानुसार आरटीपीसीआर चाचणीच्या कमाल दराबाबतचे दिनांक १३.०६.२०२० व ०४.०७.२०२० च्या शासन निर्णयानुसार निश्चित केलेले दर दिनांक ०७.०८.२०२० रोजीच्या शासन निर्णयानुसार अधिक्रमित करून याच शासन निर्णयानुसार आरटीपीसीआर चाचणीचे सुधारित कमाल दर निश्चित करण्यात आले होते.

२. मिशन बिगीन अगेन अंतर्गत राज्यातील औद्योगिक/औषध निर्माण संस्था सुरू झाल्या आहेत. तसेच परिवहन व्यवस्थाही सुरू झाली आहे. तपासणीसाठी आवश्यक रिएजंट्स, व्हीटीएम किट्स व पीपीई किट्स, एन ९५ मास्क, आरएनए एक्स्ट्रॅक्शन किट GeM पोर्टल वर अत्यंत माफक दरात उपलब्ध झाले आहे. तसेच आयसीएमआरने विविध उत्पादक कंपन्यांना मान्यता दिल्याने, उपलब्धता वाढली आहे. परिणामी यांच्या किमती कमी झाल्या आहेत. राज्यात आयसीएमआर व एनएबीएलने मान्यता दिलेल्या प्रयोगशाळांची संख्या देखील मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. या सर्व बाबी लक्षात घेऊन, आरटीपीसीआर चाचणीच्या दर कमी होणे आवश्यक होते. सदर बाब लक्षात घेऊन संदर्भ क्र. १ मध्ये नमूद शासन निर्णयानुसार गठित केलेल्या समितीने दरात सुधारणा करण्याबाबत निर्देशित करण्यात आले होते. या समिती सादर केलेला अहवाल शासनाने स्विकृत केला आहे. त्यानुसार आरटीपीसीआर चाचणीचे सुधारित दर निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. यास्तव शासन आता खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय** :-

खाजगी प्रयोगशाळांनी कोवीड-१९ साठी आरटीपीसीआर तपासणीच्या दराबाबतचे संदर्भ क्र. २ मध्ये नमूद केलेल्या शासन निर्णयानुसार निश्चित केलेले दर अधिक्रमित करून आरटीपीसीआर चाचणीचे सर्व करांसहित सुधारित दर खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहेत. सदर दर निश्चिती ही साथरोग अधिनियम, १८९७ नुसार सक्षम प्राधिकाऱ्याच्या निर्देशानुसार निश्चित करण्यात येत आहेत. राज्यात कोणत्याही खाजगी प्रयोगशाळेला या कमाल मर्यादेपेक्षा अधिक दर आकारता येणार नाहीत.

| अ.क्र | तपशील | शासन आदेश दिनांक ०७.०८.२०२० नुसार निश्चित दर (रूपयांत) (प्रती तपासणी) | सर्व करांसहित सुधारित दर रूपयात (प्रती तपासणी) |
|---|---|---|---|
| 1 | Pick of sample from collection site, transport and reporting of sample (All necessary consumable like VTM, PPE etc. for collection will be borne by sample provider) | 1900/- | 1200/- |
| 2 | Collection of samples from drive through sample collection kiosks, sample collection drives, Covid Care Collection Centres, Hospital Clinic,Quarntine Centres of Laboratories, ect. (All necessary consumable like VTM, PPE, RNA extraction kit, RtPCR Kit etc. will be borne by laboratory) | 2200/- | 1600/- |
| 3 | Collection of patient sample from residence, transport of sample, testing and reporting of sample, (All necessary consumable like VTM, PPE, RNA extraction kit, RtPCR kit, etc. will be borne by laboratory) | 2500/- | 2000/- |

दिनांक ०७.०८.२०२० च्या शासन निर्णयात नमूद अटी व शर्ती पुर्वीप्रमाणेच कायम रहातील. सदर शासन निर्णय हा निर्गमित केल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

(डॉ. प्रदीप व्यास)
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) प्रधान सचिव, विधान मंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
४) सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
६) आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
७) मुख्य सचिव यांचे उप सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
९) संचालक, आरोग्य सेवा मुंबई/पुणे.
१०) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
११) उपसंचालक, आरोग्य सेवा (सर्व मंडळे)
१२) जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालये (सर्व)
१३) अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये (सर्व)
१४) मा. मंत्री (सा.आ.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१५) मा. राज्यमंत्री (सा.आ.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१६) निवड नस्ती (आरोग्य-५)/नस्ती क्र. ५८/२०२० (आरोग्य-५)